**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा शपथेवर जबाब</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– संदिप रमेश चव्हाण

वय ३६ वर्षे, धंदाः– नोकरी

रा. नेमळे, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ. डी.व्ही.गोवेकर यांचेतर्फे–</u>**

०१. मी, माझी आई, बायको व मुलगा असे रहाण्यास आहोत. माझ्या घराशेजारी माझे काका लवु सदहेव चव्हाण यांचे घर आहे. दिनांक २२/११/२०२२ रोजी संध्याकाळी ५.४५ च्या दरम्याने सिध्देश लवु चव्हाण याने आमच्या अंगणात कचरा टाकला. त्यावेळी माझी बायको तेथे समोर होती. तेथे अंगणात लघवी केली हे माझ्या बायकोने पाहिले व माझ्या बाबांना सांगितले. तेव्हा माझ्या बाबांनी त्याला जाब विचारला. तर त्याने बाबांना शिवीगाळ केली. त्यानंतर बाबांनी पोलिस स्टेशनला फोन केला. पोलिसांनी येवून समज दिली. त्यानंतर मी रात्री ८.०० वाजता कामावरुन आलो. मी व माझी बायको अंगणात बसलो होतो. त्यावेळी माझ्या काकाचा मुलगा सिध्देश लवू चव्हाण व माझी काकी वैशाली लवू चव्हाण आमच्या अंगणात आले व आम्हाला शिवीगाळ करु लागले. ‘आम्ही तुमच्या अंगणात संडास करुन ठेवू, तुम्ही खा’ असे म्हणू लागले. त्यानंतर पोलिसात तक्रार केली. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. पी. एल. गवस यांनी उलटतपास घेण्याकरीता नि. ३७ कडे अर्ज दाखल केल्याने तसेच अर्जातील कारणे पहाता साक्षीदाराचा उलटतपास साक्षीभत्त्याच्या अधीन राहून पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.07.24 10:30:26 +0530

दिनांकः– २२/०७/२०२४

(श्रीमती आर.जी.कुंभार)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

सावंतवाडी.